पुण्य नगरी

# राज्यघटनेची मूल्ये घराघरांत पोहोचविण्याचा निर्धार

## ■ आदिवासी व सामाजिक न्यायविभागाचे सचिव विजय वाघमारे ■ विभागीय आयुक्तांच्या हस्ते 'घर घर संविधान'चा शुभारंभ

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी



नागपूर : भारतीय संविधानाने प्रत्येक व्यक्तीला बहाल केलेले बहुमोल स्वातंत्र्य, समान न्यायाचे तत्त्व, नागरिक म्हणून दिलेले अधिकार व यासमवेत दिलेली कर्तव्याची जबाबदारी याबाबत समाजातील प्रत्येक घटकात जनजागृती होणे आवश्यक आहे. भारतीय संविधान आपण अंगीकारून आज ७५ वर्षे झाली आहेत. याचे औचित्य साधून शासनाने 'घर घर संविधान' हा घेतलेला उपक्रम तेवढाच महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन आदिवासी व सामाजिक न्यायविभागाचे सचिव विजय वाघमारे यांनी केले. यावेळी त्यांनी माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिलेल्या 'राज्यघटनेची मूल्ये घराघरांत पोहोचविण्याचा निर्धार' या शुभेच्छा संदेशाचे वाचन केले.

संविधानदिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त 'घर घर संविधान' उपक्रमाचा २६ नोव्हेंबर रोजी नागपूर येथे विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, समाजकल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त बाबासाहेब देशमुख, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे उपसंचालक विजय वाकुलकर, जिल्हा जातप्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त डॉ. मंगेश वानखेडे, साहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी किशोर भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी, दिव्यांगांचा प्रातिनिधिक सन्मान करण्यात आला. यावेळी विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी म्हणाल्या, भारतीय संविधानातील स्वातंत्र्याचे, सामाजिक जबाबदारीचे, कर्तव्यतत्परतेचे नागरिक म्हणून देशाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्याचे मोल विभागातील सर्व जिल्ह्यांत पोहोचविण्यासाठी आपण विविध उपक्रम हाती घेणार आहोत. यात शालेय विद्यार्थ्यांपासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत, ग्रामपंचायतीपासून जिल्हा परिषदेपर्यंत व प्रशासकीय यंत्रणेतील प्रत्येकापर्यंत भारतीय राज्यघटनेचे मूल्य पोहोचविले जाणार आहे. मान्यवरांद्वारे संविधान चौकातही राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेलाही माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

### माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा विशेष संदेश



भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात 'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून स्वातंत्र्याचे मोल प्रत्येक गावामध्ये पोहोचविण्यात यशस्वी झालो. आता 'घर घर संविधान' उपक्रमातून आणखी एका महत्त्वपूर्ण ऐतिहासिक घटनेचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यास सिद्ध झालो आहोत. प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्तिस्वातंत्र्यासह मूलभूत स्वातंत्र्य बहाल करणारी राज्यघटना आपल्याला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडून मिळाली. सामाजिक न्याय, राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्ष मूल्यांचा प्रचार व प्रसार ही जबाबदारी, भावना यात अंतर्भूत आहे. संविधानाची मूल्ये सर्व घटकांपर्यंत रुजविण्यासाठी कटिबद्ध होऊ या, अशा भावना माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आपल्या संदेशात व्यक्त केली.

Nagpur Edition
Nov 27, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com